ग्रामीण उद्योग संधींची सद्यस्थिती

प्रा. दीपक ताटपुजे

देशाच्या आर्थिक विकासामध्ये लघु - उद्योगांचे मोठे योगदान आहे. स्थानिक तसेच परदेशी बाजारपेठेची निकड काही प्रमाणात पूर्ण करण्यासाठी लघु - उद्योगांनी महत्वाची कामगिरी बजावली आहे. उद्योगांचे विकेंद्रीकरण हे फार मोठी समस्या विकसनशील देशांसमोर आज उभी आहे.

कच्या मालाची उपलब्धता, वाहतुक खर्च, पायाभुत सुविधांचा अभाव, स्थानिक बाजारपेठेची मर्यादा, नाशवंत मालाचा टिकावूपणा ठेवण्यासाठीच्या तंत्रज्ञानाची अनुउपलब्धता हे ग्रामीण उद्योग विकास वाढीमधील महत्वाचे अडथळे आहेत. मात्र योग्य व्यवसायाची निवड आणि प्रशिक्षणांची उपलब्धता यांचे नियोजन केल्यास ग्रामीण उद्योगांची भरभराट नक्कीच होणे शक्य आहे.

आपल्या महाराष्ट्र राज्यात एकूण उभारलेल्या उद्योगांपैकी यशस्वी उद्योगांचे प्रमाण फारच कमी आहे. तसेच उद्योग उभारणीचा वेग ही बाजारपेठेच्या तुलनेत मर्यादीत आहे. यामुळेच शासनाच्या रिझर्व बँकेने केलेल्या तरतुदी उद्योग-विकासाच्या दृष्टीने अतिशय तुटपुंज्या असल्याने या क्षेत्राच्या विकासाकडे अधिक गांभीर्यपूर्वक पाहणे गरजेचे आहे. तसेच केवळ उद्योग-संधींचा फायदा घेणे ही प्रक्रिया सुध्दा बेरोजगारी कमी करण्यासाठी उपयुक्त नसुन या लाभार्थींनी यशस्वी उद्योगासाठी जिद्दीने व्यवसाय करून उद्योग - उभारणी समर्थपणे चालवण्याची सामाजिक मानसिकता तयार होणे अत्यंत आवश्यक आहे.

भारतासारख्या कृषि-प्रधान देशामध्ये ग्रामीण भागात शेतीमालाची उपलब्धता मोठ्या प्रमाणावर असल्याने कृषि-पुरक उद्योगांची वाढ करून उद्योगांचे विकेंद्रीकरण करणे शक्य आहे. त्यामुळेच अतिलघुत्तम उद्योजकता (मायक्रो आंयप्रिनरशिप) या क्षेत्राशी निगडीत विकसित होणे गरजेचे आहे. ज्यामुळे ग्रामीण युवकांना स्थानिक रोजगार मोठ्या प्रमाणावर उपलब्द होऊ शकतो.

एकात्मिक ग्रामीण पतपुरवठा प्रकल्पांर्तगत सन १९९७ अखेर एकूण ७३.२५ लाख लाभार्थी कुटुंबांपर्यंत स्वयंरोजगारासाठी पतपुरवठा झाला असला तरीही सक्षम स्वयंरोजगाराचे प्रमाण अत्यल्प आहे. या प्रकल्पांर्तगत कृषि-पुरक उद्योगांची परिस्थिती मात्र एकूण विकास प्रक्रियेची गतीत समाविष्ट आहे.

सहा महिने मुदतीपर्यंत स्वयंरोजगाराचे आणि तांत्रिक प्रशिक्षणाचा समावेश असणारी 'ट्रायसेम' या योजनेच्या समक्ष उद्योग दिर्घकाळपर्यंत चालू राहण्यात मात्र बरीचशी अपयशी ठरली आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे त्या स्थानिक निकडीच्या प्रमाणातीला विसंगत उद्योगांची निवड हेच आहे. टेलिफोन, टिव्ही, व्हि.सी.आर., प्लंबर, वायरमन आदी तंत्रज्ञाचा दुरूस्ती करणाऱ्या तंत्रज्ञांच्या स्वयंरोजगाराची ग्रामीण भागातील आवश्यकता अत्यल्प असणारा हा वर्ग पुन्हा स्वयंरोजगारासाठी शहराकडे खुल्या स्पर्धेत टिकू शकलेला नाही. या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील लोकसंख्या, राहणीमानाचा स्तर, सुविधांची आवश्यकता, अत्यावश्यक सेवांची गरज आदींचा विचार करतानाच शेतीपुरक उद्योगांसाठी उपलब्ध असणाऱ्या पायाभूत सुविधांचा विचार करून प्रशिक्षणांची निवड करणे आवश्यक आहे.

या ट्रायसेम योजनेचे १९९३ ते १९९७ अखेर पर्यंतचे एकूण लाभार्थी ८.७१ लाख एवढे असून त्यांना व्यवसायासाच्या प्रशिक्षणासाठी दिलेले विद्यावेतन, पतपुरवठा, पुरवलेली हत्यारे आदींचा समावेश असूनही ग्रामीण स्तरावर आवश्यक तेवढ्या प्रमाणात स्वयंरोजगार निर्मिती होऊ शकलेली नाही.

ग्रामीण भागातील दारिद्र रेषेखालील महिलांनी बचत गटांची स्थापना करून व्यवसाय निर्मितीसाठी ''डवाक्रा'' या योजनेने १९९३ ते ९७ या काळात एकूण १ लाख २ हजार गटांची स्थापना होऊन व्यवसाय सुरू झाले आहेत. या बचत गटातील महिलांचे बहुतेक व्यवसाय खाद्य पदार्थांची निर्मिती (पापड, लोणची व अन्य) तसेच हस्तकला या स्वरूपाचे असून या तयार मालासाठी बाजारपेठ शोधणे या कामी शिक्षण असलेल्या महिलांनी शक्य न झाल्याने

यशस्वी उद्योगांचे प्रमाण अत्यल्प असेच आहे. मात्र ज्या महिला गटांनी सहकारी तत्वावरील ग्राहक संघांशी व्यवसाय - बांधिलकी ठेवली आहे असेच अनेक उद्योग बऱ्याच प्रमाणात यशस्वी झाल्याचे दिसून येते.

शहरी युवकांबरोबरच ग्रामीण भागातील युवकांसाठीही पंतप्रधान रोजगार योजने अंतर्गत व्यवसाय सुरू केलेल्यांची परिस्थिती चुकीच्या व्यवसाय निवडीमुळे समाधानकारक दिसत नाही. त्याचप्रमाणे लघुत्तम उद्योगांसाठी (टायनी इंडस्ट्रीज) जवाहर रोजगार योजने अंतर्गत १९९३ ते १९९७ या काळात आपल्या देशात एकूण ३०१११.९७ लाख एवढे स्वयंरोजगार देण्यात आले. मात्र याही योजनेतील दिर्घकाळ चालणाऱ्या समक्ष उद्योगांचे प्रमाण अत्यल्प आहे असेच म्हणावे लागेल.

विविध स्तरांवर वेगवेगळे उद्योग सुरू करून चालण्यासाठी एवढ्या मोठ्या प्रमाणावर योजना राबहूनही मागील दहा वर्षात देशाच्या आर्थिक आघाडीवर आवश्यक तेवढा विकास साधला गेलेला नाही.

स्वयंरोजगारासाठी आजही या सर्व प्रशिक्षण, अनुदान, वित्तसहाय्य योजना चालू असताना युवकांनी उद्योजक होण्यासाठी त्या त्या परिसरातील निकडांची माहिती घेऊन स्वयंरोजगार निवडणे ही काळाची मोठी गरज होत आहे.

ग्रामीण भागात शेतीपुरक उद्योगांसाठी कच्चा माल उपलब्ध असल्याने शेळी, मेंढी पालन, कृषि-अवजार दुरूस्ती केंद्रे, जीवाणू खतांचा वापर आणि विक्री जाळे, शेतीमालावरीला प्रक्रिया केंद्रे, शेती-उद्योगातील आधुनिक तंत्रज्ञान विकास केंद्र आदींसारखे व्यवसाय करण्याच्या दृष्टीने 'नाबार्ड' सारख्या संस्थांच्याा मदतीने यशस्वी होतील. या संस्थेला शेती आणि पुरक व्यवसायांच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणावर रिझर्व्ह बँकेकडून पतपुरवडा होत असल्याने या गोष्टी त्या उद्योजकाच्या तसेच देशाच्या आर्थिक विकासाला पुरक ठरतील असा विश्वास वाटतो.